नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे | Year - 2nd
अंक - २१२ | Issue - 212
वार गुरूवार दि. १९ डिसेंबर २०२४ | Blow- Thursday Date 19 December 2024
ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com
वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com
पाने - ४ | Pages - 4
किंमत - ४.०० रुपये | Amount - 4 /- Rs
पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026
ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## थोडक्यात...

### एसटी दगडफेक प्रकरणातील एक अटक तर एक फरार

सोलापूर : परभणी येथे झालेल्या हिंसाचाराच्या निषेधार्थ सोलापुरातील कार्यकर्त्यांनी सोमवारी सायंकाळी दगडफेक केली होती.जवळपास तीन एसटीचे मोठे नुकसान झाले होते.तसेच एक एसटी जाळण्यात आली होती. एसटी महामंडळाने फौजदार चावडी पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीच्या विरोधात गुन्हा दाखल केला होता. दरम्यान फौजदार चावडी पोलीस पथकातील पोलीस पथकांनी तपास करत बसवर दगडफेक करणारा जितेश शरणबसप्पा महिंद्रकर (वय-३२-,रा.रमाबाई आंबेडकर नगर, न्यू बुधवार पेठ,सोलापूर) यास अटक केली आहे. त्याचा साथीदार मोहसीन हा पाहिजे असून तो अद्याप पर्यंत मिळून आलेला आहे.तसेच या गुन्ह्यामध्ये दगडफेक करण्यासंदर्भात कट केल्याचे निष्पन्न झाल्याने तशी कलम वाढ केली आहे. संशयित आरोपीस बुधवारी न्यायालयात हजर केले असता दोन दिवस पोलीस कोठडी मिळाली आहे.पुढील तपास चालू आहे अशी माहिती फौजदार चावडी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पो. निरीक्षक अरविंद माने यांनी दिली.

### विवाहितेचा छळ ; पतीसह तिघाविरुद्ध गुन्हा

सोलापूर (प्रतिनिधी) घरातील कामाच्या किरकोळ कारणावरून खोटेनाटे आरोप करून शिव्याकाळ करीत सतत वाद घालत माहेरून घर खर्चासाठी व इतर खर्चासाठी दोन लाख रुपये घेऊन ये म्हणत विवाहितेचा छळ केल्याची घटना २९ नोव्हेंबर रोजी मोपो वागदरी तालुका अक्कलकोट येथे घडली. याप्रकरणी शोभा शिवशरण यमाजी (वय ३३, रा. सध्या ६७, बाबुराव परळकर नगर, आकाशवाणी रोड, एमआयडीसी) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्यादी दिली. त्यांच्या फिर्यादीवरून पती शिवशरण यमाजी, सासरे सिद्धपा यमाजी, सासू लक्ष्मीबाई यमाजी सर्व रा. मु.पो. वागदारी, ता. अक्कलकोट यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. यात अधिक माहिती अशी की, फिर्यादीच्या वडिलांनी लग्नात घातलेले साडेसहा तोळे सोने काढून घेतले आहे. शेतात दिवसभर काम करायला लावून ओढणीने गळफास लावतो अशी धमकी दिली. तसेच फिर्यादीस शारीरिक मानसिक व आर्थिक त्रास दिल्याचे फिर्यादीत नमूद आहे. पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल शिंदे हे करीत आहेत.

# मुंबईतील बोट दुर्घटनेत १३ जणांचा मृत्यू

## १०१ प्रवाशांना सुरक्षित बाहेर काढण्यात आले यश; मृतांच्या नातेवाईकांना पाच लाखांची मदत जाहीर

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

मुंबई : मुंबईमधून एलिफंटाकडे जाणारी एक प्रवासी बोट बुधवारी सायंकाळी बुडाल्याची दुर्घटना घडली. या घटनेत तब्बल १३ जणांचा मृत्यू झाला आहे. या मृतांमध्ये तीन नौदल कर्मचाऱ्यांचाही समावेश आहे. तसेच या बोटमधून १०१ प्रवाशांना सुरक्षित बाहेर काढण्यात आलं असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. तसेच या दुर्घटनेत मृत्यू झालेल्या मृतांच्या नातेवाईकांना पाच लाखांची मदत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केली आहे. माध्यमांशी बोलताना त्यांनी यासंदर्भातील माहिती दिली.

मुंबईवरून एलिफंटाकडे नीलकमल ही बोट जात होती. मात्र, या बोटीला गेट ऑफ इंडियाजवळ ही बोट बुडाल्याची घटना घडली. या बोटेतून १०० पेक्षा जास्त प्रवाशी प्रवास करत होते. ही दुर्घटना घडल्यानंतर लगेचच तातडीने मदतकार्य करण्यात आले. यावेळी नौदलाने या बोटीमधील १०१ प्रवाशांना सुरक्षित वाचवलं. तर या घटनेत १३ जणांचा मृत्यू झाला आहे. तसेच अद्यापही नौदलाकडून आणि पोलिसांच्या समन्वयाने बचाव कार्य करण्यात येत आहे. यामध्ये चार नौदलाचे हेलिकॉप्टर, ११ नौदल क्राफ्ट आणि एक तटरक्षक दलाची नौका आणि तीन सागरी पोलीस नौका बचावकार्य करत असल्याची माहिती देण्यात आली आहे.





मुंबई शहराजवळ अरबी समुद्रात नीलकमल कंपनीच्या एका प्रवाशी बोटीच्या अपघाताची घटना अत्यंत दुर्दैवी आहे. या घटनेत सायं.७.३० पर्यंत प्राप्त माहितीनुसार, बोटीतील एकूण प्रवाशांपैकी १०१ लोकांना सुरक्षित वाचवण्यात आलं आहे. नौदलाचे व्हाईस डमिरल संजय जगजित सिंग यांनी दिलेल्या माहितीनुसार, नौदलाच्या डॉक्टरांनी सायंकाळी ७.३० पर्यंत १३ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. यात ३ नौदलाचे जवान असून १० नागरिक आहेत. या दुर्घटनेत मृत्यू पावलेल्यांना मी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. त्यांच्या कुटूंबियांच्या दु:खात आम्ही सहभागी आहोत. तसेच २ गंभीर जखमींना नौदल रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. त्यांच्या प्रकृतीत लवकर सुधारणा व्हावी, अशी ईश्वरचरणी प्रार्थना करतो. प्रसंगाचे गांभीर्य लक्षात घेता नौदल, कोस्टगार्ड, मुंबई पोलिस यांनी तातडीने बचावकार्य हाती घेतले. या बचावकार्यात नौदलाचे ११ क्राफ्ट आणि ४ हेलिकॉफ्टर्सची मदत घेण्यात आली. अद्यापही शोधकार्य सुरुच आहे. त्यामुळे सविस्तर माहिती उद्यापर्यंत प्राप्त होईल. मृतांच्या वारसांना मुख्यमंत्री सहायता निधीतून ५ लाख रुपयांची आर्थिक मदत देण्यात येईल. या घटनेची नौदल आणि राज्य सरकारमार्फत चौकशी केली जाईल, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एक्सवरील (ट्विटर) पोस्टमध्ये म्हटलं आहे.

अपघातानंतर प्रवाशांना किनाऱ्यावर आणण्यात आलं. त्यापैकी एका प्रवाशाने सांगितलं, आमची बोट पाच ते सात किमी समुद्रात होती. त्यावेळी मी बोटीच्या डेकवर उभा होतो. एक स्पीड बोट आमच्या आजूबाजूला फिरत होती. ही स्पीड बोट आम्हाला धडकू शकते अशी भीती मला वाटली. नेमकं घडलंही तसंच. ही स्पीडबोट भरधाव वेगाने आली आणि आमच्या बोटीला जोरात धडकली. त्यावेळी स्पीडबोटमधल्या काही प्रवाशांचा मृत्यू झाला तर दुसऱ्याचा पाय कापला गेला. रक्तबंबाळ अवस्थेतल्या त्या जखमी प्रवाशाला आमच्या बोटीत घेण्यात आलं. स्पीडबोटची धडक जोरात बसल्याने आमच्या बोटीत पाणी शिरु लागलं आणि बोट बुडू लागली अशी माहिती या प्रत्यक्षदर्शी प्रवाशाने दिली आहे.

# लाख रुपयांची लाच घेताना डॉक्टराला रंगेहात पकडले

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

सोलापूर (प्रतिनिधी) रक्त तपासणी केंद्राचा अहवाल सकारात्मक देतो म्हणून १ लाखांची लाच घेताना महात्मा फुले जन आरोग्य सोलापूर केंद्राचे प्रमुख डॉ माधव जोशी यांना लाच लुचपत प्रतिबंध विभागाने रंगेहात पकडले.ही कारवाई बुधवार लाच लुचपत प्रतिबंधक विभागाकडून करण्यात आली.

रक्त लघवी तपासणी करणाऱ्या खाजगी प्रयोगशाळे ला महात्मा फुले जन आरोग्य विभागाकडून टेंडर मिळाले होते.परंतु त्या प्रयोगशाळे विरुद्ध नागरिकांच्या तक्रारी येत असल्याने त्याबाबत तपासणी करण्याचे आणि अहवाल तयार करण्याची जबाबदारी डॉ माधव जोशी यांच्याकडे होती. त्या प्रयोगशाळे चा अहवाल सकारात्मक देण्यासाठी प्रयोगशाळा चालकाकडे माधव जोशी यांनी २ लाखाची लाचेची मागणी केली आणि १ लाखाचा लाचेचा पहिला हप्ता स्वीकारत असताना लाच लुचपत प्रतिबंध विभागाच्या पोलिसांनी डॉ माधव जोशी यांना सापळा लावून रंगेहात पकडले.




ही कारवाई पोलीस उपअधीक्षक गणेश कुंभार,पोलीस हवालदार,श्रीराम घुगे,पोलीस शिपाई राजू पवार,सचिन राठोड ,श्याम सुरवसे या पथकाने पार पडली.या घटनेमुळे वैद्यकीय क्षेत्रात खळबळ उडाली आहे.

# बाबासाहेब आंबेडकर विरोधीच आहे काँग्रेस पक्ष, शहा यांचा आरोप

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

नवी दिल्ली : अमित शाह यांनी बाबासाहेब आंबेडकर यांचा अपमान केला असा आरोप अमित शाह यांच्यावर होतो आहे. अमित शाह यांच्यावर काँग्रेसने अनेक आरोप केले. त्यानंतर अमित शाह यांनी पत्रकार परिषद घेतली. काँग्रेसचे आरोप हा सत्याला असत्याचे कपडे घालण्याचा कुत्सित प्रयत्न आहे असं अमित शाह यांनी म्हटलं आहे. लोकसभा आणि राज्यसभा या दोन्ही सभागृहांत संविधानाला ७५ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल संविधानाचं योगदान, संविधानाचं महत्त्व या विषयाचं आयोजन केलं. ७५ वर्षांची देशाची गौरवयात्रा, विकासयात्रा यांची चर्चा झाली. लोकसभा आणि राज्यसभेत जेव्हा सत्ताधारी आणि विरोधी पक्ष असतात तेव्हा प्रत्येकाचे दृष्टीकोन वेगळे असतात असं अमित शाह म्हणाले.

जेव्हा संसदेत चर्चा होते तेव्हा एक गोष्ट महत्त्वाची आहेती म्हणजे जे काही मांडलं जाईल त्याला आधार हवा, तथ्य हवं. काँग्रेस पक्षाने सोमवारपासून वास्तवाची तोडफोड केली आहे. ही बाब निषेधार्ह आहे. मी याचा तीव्र निषेध करतो. भाजपाच्या वक्त्यांनी संविधानाबाबत, संविधानाच्या मूल्यांवर भाष्य केलं. संविधानाचं कसं संवर्धन केलं ते भाजपाच्या वक्त्यांनी उदाहरणांसह सांगितलं. काँग्रेस पक्ष हा बाबासाहेब आंबेडकरांचा विरोध करणारा पक्ष आहे, संविधान विरोधी पक्ष आहे. काँग्रेस पक्षाने वीर सावरकरांचाही अपमान केला. काँग्रेसने



आणीबाणी लादून संविधानाची लक्तरं केली. स्त्रियांच्या सन्मानासारखा विषय त्यांनी बाजूला फेकला होता. न्याय व्यवस्थेचा अपमान केला, शहिदांचा अपमान केला. भारताची भूमी तोडण्याचं काम काँग्रेसने केलं. हे सगळं सत्य देशासमोर आलं तेव्हापासून काँग्रेसने प्रुहा एकदा गोष्टी तोडफोड करुन आणि सत्याला असत्याचे कपडे घालण्याचा एक कुत्सित प्रयत्न केला आहे असं अमित शाह यांनी म्हटलं आहे.

अमित शाह पुढे म्हणाले, काँग्रेस पक्षाने बाबासाहेब आंबेडकर यांचा विरोध दर्शवला. बाबासाहेब आंबेडकर यांच्या निधनानंतरही काँग्रेसने हेच केलं. १९५१-५२ आणि १९५४ मध्ये बाबासाहेब आंबेडकरांना हरवण्याचे प्रयत्न केले. मैत्रीपूर्ण लढतही घेतली गेली नाही. बाबासाहेब आंबेडकर यांचा पराभव कसा होईल तेच पाहिला. भारतरत्न पुरस्काराबाबत बोलायचं झालं तर काँग्रेसच्या नेत्यांनी काही वेळा तर स्वतःच स्वतःला भारतरत्न पुरस्कार दिला आहे. १९५५ मध्ये पंडित नेहरुंनी स्वतःला भारतरत्न पुरस्कार दिला. १९७१ मध्ये इंदिरा गांधींनी स्वतःला भारतरत्न पुरस्कार जाहीर केला. १९९० मध्ये बाबासाहेब आंबेडकर यांना भारतरत्न पुरस्कार देण्यात आला. त्यावेळचं सरकार हे भाजपाच्या पाठिंब्यावर चालणारं सरकार होतं. १९९० पर्यंत काँग्रेस पक्षाने बाबासाहेब आंबेडकरांना भारतरत्न मिळू नये यासाठी प्रयत्न केले. बाबासाहेब आंबेडकर यांची १०० वी जयंतीही साजरी केली नाही. पंडित नेहरुंना बाबासाहेब आंबेडकरांविषयी वाटणारा तिरस्कार जगजाहीर आहे. पंडीत नेहरुंचं पुस्तक सिलेक्टेड वर्ड्स ऑफ जवाहर याच्या दुसऱ्या आवृत्तीततील पृष्ठ क्रमांक ५३२ वर एक उल्लेख आहे. त्यात बाबासाहेब आंबेडकर मंत्रिमंडळातून जाऊ इच्छितात असं पत्र आहे त्यावर पंडीत नेहरु यांनी उत्तर दिलं आहे की आंबेडकर मंत्रिमंडळातून गेल्याने काही फरक पडणार नाही. बाबासाहेब आंबेडकरांच्या योगदानचं मूल्यांकन नेहरु कसं करत होते हे सांगणारं हे उदाहरण आहे. असं अमित शाह म्हणाले.

# तहसिलदाराच्या मदतीने माजी आमदाराची फसवणुक; तिघांविरूध्द गुन्हा दाखल

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

सोलापूर (प्रतिनिधी) शेत जमीनीवर परस्पर नाव नोंदवून मोठ्या भावानेच तहसिलदाराच्या मदतीने माजी आमदाराची फसवणुक केल्याची घटना उघड झाली. याबाबत पोलीसांकडे तिघांविरूध्द फसवणुकीचा गुन्हा दाखल झाला आहे.

महादेव बाबुराव चाकोते, जयशंकर महादेव चाकोते आणि तत्कालीन तहसिलदार उत्तर सोलापूर असे आरोपींची नावे आहेत. याबाबतची अधिक माहिती अशी की, सोलापूर शहर उत्तरचे माजी आमदार विश्वनाथ बाबुराव चाकोते यांचे शेतजमीन उत्तर सोलापूर तालुक्यातील कारंबा येथे गट नं.११२/१ अशी असून त्यावर विश्वानाथ चाकोते यांच्यासह मोठा भाऊ महादेव चाकोते यांच्यासह चारजणांचे नावे होते. ती जमीन आमच्या कब्जे वहिवाईटीत असताना मोठा भाऊ महादेव चाकोते याने आम्हाला कसलीच माहिती न देता आमचे नाव कमी करून परस्पर शेतजमीनीवर तत्कालीन तहसिलदार उत्तर सोलापूर यांच्या मदतीने स्वतःचे आणि त्यांचा मुलगा जयशंकर महादेव चाकोते यांचे नाव लावून घेतले. तसेच नवसमता ट्रान्सपोर्ट या आमच्यावडिलोपार्जित व्यवसायाच्या नावाने हैदराबाद येथील ऑटो नगर मध्ये असलेली जमीन परस्पररित्या आमचे नाव वगळून आम्हाला कोणतीही माहिती न देता मूळ कागदपत्रे गहाळ करून नव्याने बनावट कागदपत्रे तयार करून बाबुराव चाकोते यांचा मीच एकटा वारसदार आहे असे भासवून अधिकार्यांशी संगनमत करून आमची फसवणुक केली तसेच तुम्ही कसे जमीन घेता ते बघतो अशी फिर्याद सोलापूरच्या सदर बझार पोलीस ठाण्यात गुरनं.९७५/२०२४ प्रमाणे आणि हैदराबाद येथील हयात नगर पोलीसांकडे गुरनं.६८७/२०२१ प्रमाणे रितसर दाखल झाली.

## मल्लिकार्जुन खरगे आक्रमक

## अमित शाह यांच्या राजीनाम्याची केली मागणी

# चुकीच्या विधानांना पंतप्रधान मोदी पाठिंबा देतात

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

नवी दिल्ली : केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी मंगळवारी राज्यसभेत बोलताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांबाबत केलेल्या एका विधानावरून सध्या राजकीय वातावरण तापल्याचं पाहायला मिळत आहे. यानंतर विरोधी पक्षांकडून आक्रमक भूमिका घेण्यात आली आहे. यादरम्यान काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी अमित शाह यांनी तात्काळ राजीनामा दिला पाहिजे अशी मागणी केली आहे. यासोबतच अमित शाह यांच्या बचावासाठी सोशल मिडिया प्लॅटफॉर्म एक्सवर ओळीने पोस्ट करणाऱ्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर देखील खरदे यांनी टीका केली आहे.

काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे माध्यमांशी बोलताना म्हणाले की, ज्या विचारधारेला आंबेडकर मानत नव्हेत, स्वर्ग आणि नरक याबद्दल ते कधीही बोलले नाहीत. त्यावरून त्यांचे (भाजपा) गृहमंत्री विधान करतात. तर मोदींनी त्यांचा बचाव करण्यासाठी सहा ट्वीट केले. काय गरज होती? जर कोणी बाबासाहेबांविरोधात चुकीचे बोलले तर त्याला आपल्या मंत्रिमंडळातून काढून टाकले पाहिजे होते, पण दोघांमध्ये घट्ट मैत्री आहे. दोघे एकमेकांच्या पापाला पाठिंबा देतात. यांनी जर काही पाप केले तर ते सपोर्ट करतात, त्यांनी काही पाप केलं किंवा चुकीचे विधान केले तर मोदी पाठिंबा देतात.

खरगे पुढे बोलताना म्हणाले की, मला मोदींकडून हे जाणून घ्यायचं आहे की, जो व्यक्ती आणि ज्या संविधानाची तुम्ही चर्चा करत आहात. या ग्रंथाला पवित्रा मानून तुम्ही सगळ्यांशी बोलत आहात. खरंतर मोदींनी याला कधीही सन्मान दिला नाही. याला रामलीला मैदानात जाळण्यात आले. आम्ही देशासाठी तयार केलेल्या तिरंगा झेंड्याला देखील नाकारले, त्यांचे म्हणणे होते की हे संविधान आपले नाही, हे मनूच्या लाईनवर नाही म्हणून आम्ही हे मानत नाही. त्यांनी नेहरू, गांधी, आंबेडकरांचे फोटो जाळले, तिरंगा झेंड्याचा देखील यांनी तिरस्कार केला. हेच त्यांच्या मनात आहे. म्हणूनच डॉक्टर बाबासाहेब





आंबेडकर यांच्याबद्दल हे विधान केले.

केंद्रीय गृहमंत्री आणि ज्येष्ठ नेते अमित शाह यांच्या राजीनाम्याची मागणी करताना खरगे म्हणले की, जर एखादा व्यक्तीच्या मनात त्यांच्यासाठी (डॉ. बाबासाहेब आंबेडकर) श्रद्धा असती, त्यांच्याबद्दल अभिमान असता तर ते ही गोष्ट तो व्यक्ती बोलला नसता. त्यामुळे आमची मागणी आहे की, अमित शाह यांनी राजीनामा दिला पाहिजे आणि जर मोदींना बाबासाहेब आंबेडकरांबद्दल थोडीही श्रद्धा असेल तर रात्री १२ वाजण्याच्या आधी त्यांना (अमित शाह) बरखास्त केले पाहिजे.

आमची मागणी ही आहे की, जो व्यक्ती संविधानाची शपथ घेऊन मंत्री बनतो आणि तो त्याच संविधानाचा अपमान करत असेल तर त्याला मंत्रिमंडळात राहाण्याचा काहीही अधिकार नाही. त्यांना बरखास्त केला पाहिजे, तरच देशातील लोक शांत राहातील. अन्यथा सगळीकडे बाबासाहेबांच्या नावाने घोषणा देतील. त्यांच्यासाठी जीव द्यायलाही लोक तयार आहेत, असेही मल्लिकार्जुन खरगे म्हणाले.

मंगळवारी राज्यसभेत बोलताना अमित शाह यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा उल्लेख करत केलेल्या विधानावर विरोधकांनी तीव्र आक्षेप घेतला आहे. हल्ली फॅशनच झाली आहे. आजकाल आंबेडकरांचे नाव सारखे सारखे घेणे ही फॅशन झाली आहे. आंबेडकर, आंबेडकर, आंबेडकर असा जप काही लोक करत असतात. एवढ्या वेळा जर देवाचे नाव घेतले तर एखाद्याला स्वर्गात जागा मिळेल, असं अमित शाह म्हणाले होते.

## संपादकीय....

### अपमानाचे आरोप

काँग्रेस पक्ष आंबेडकरविरोधी, संविधानविरोधी, आरक्षणविरोधी आहे. बाबासाहेब आंबेडकरांचा पराभव करण्यासाठी त्यांनी हरतऱ्हेचे प्रयत्न केले, अशा शब्दांत गृहमंत्री अमित शहांनी विरोधी पक्षावर सडकून टीका केली. काँग्रेसनं देशात आणीबाणी लागू केली आणि आता हाच पक्ष संविधानाचा अपमान झाल्याची भाषा करत आहे. राज्यसभेतील माझ्या विधानाची मोडतोड करुन ते दाखवण्यात आलं. माझं पूर्ण विधान दाखवा. मग तुम्हाला सत्य समजेल, असं शहा म्हणाले. भारतीय जनता पक्षाच्या दिल्लीतील मुख्यालयात त्यांनी पत्रकार परिषद घेतली. 'काँग्रेस आंबेडकरविरोधी, संविधानविरोधी असल्याचं सत्य भाजपच्या अनेक खासदारांनी संसदेत मांडलं. त्यामुळे मग काँग्रेसनं समाजात संभ्रम निर्माण करण्याचे उद्योग सुरु केले. काँग्रेसनं बाबासाहेबांना कशा पद्धतीनं विरोध केला. त्यांच्या पराभवासाठी कसे प्रयत्न केले, हे आता उघडकीस आलेलं आहे. काँग्रेसच्या नेत्यांनी स्वत:ला भारतरत्न दिले. पण त्यांनी बाबासाहेब आंबेडकरांना भारतरत्न दिला नाही. जेव्हा काँग्रेस पक्ष सत्तेत नव्हता, भाजपचा पाठिंबा असलेलं सरकार सत्तेत होतं, तेव्हा आंबेडकरांना भारतरत्न मिळाला,' असं शहा म्हणाले. 'मी कधीही बाबासाहेब आंबेडकरांचा अपमान करु शकत नाही. माझं विधान तोडूनमोडून दाखवण्यात आलं. मी नेहमी आंबेडकरांच्या विचारांवर चालत आलो आहे. संविधान दिवस साजरा करण्याची सुरुवात भाजपनं केली,' याची आठवण शहांनी करुन दिली. 'ज्या समुदायासाठी आंबेडकरांनी त्यांचं संपूर्ण आयुष्य खर्ची घातलं, त्या समाजातून येणाऱ्या मल्लिकार्जुन खरगे यांनी तरी किमान काँग्रेसच्या कुत्सित प्रयत्नांचा भाग व्हायला नको होतं. पण खरगेंनी राहुल गांधींच्या दबावाखाली येऊन पत्रकार परिषद घेतली,' असा दावा शहांनी केला. 'काँग्रेसकडून देशाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न सुरु आहे. संभ्रम निर्माण करण्याचे प्रयत्न केले जात आहेत. काँग्रेस आता हतबल झाली आहे. आंबेडकरांचा अपमान काँग्रेसनं कसा केला हे आता जगजाहीर आहे. भाजप कायम आंबेडकरांच्या विचारांवर चालत आलेला आहे. काँग्रेसनं आयुष्यभर आंबेडकरांचा अपमान केला. मी स्वप्नातही आंबेडकरांचा अपमान करु शकत नाही. त्यामुळे माझं विधान पूर्ण दाखवण्यात यावं,' असं आवाहन त्यांनी केलं.

# विदेशातील बँकांमध्ये ठेवलेले शंभर टन सोने भारताच्या रिझर्व्ह बँकेने परत आणले

सोने हा भारतीयांचा अत्यंत जिव्हाळ्याचा विषय आहे. भारतात सोन्यामध्ये केली जाणारी गुंतवणूक ही केवळ 'गुंतवणूक' नसते, तर त्यात लोकांच्या भावना गुंतलेल्या असतात. सोन्याच्या सांस्कृतिक आणि पारंपरिक महत्त्वामुळे भारतीय लोकांचा कल नेहमीच सोने खरेदीकडे राहिला आहे. किडूक-मिडूक का असेना, देशातील प्रत्येक घरात सोने असतेच असते. सोने हा भारतीयांचा वीक पॉइंट आहे असे म्हटले तरी चालेल. त्यामुळेच जागतिक पातळीवर भारत हा सोन्याचा सर्वात मोठा आयातदार आहे.

सध्या भारतीय रिझर्व्ह बँकेकडे ८५४.७३ मेट्रिक टन सोने आहे. यातील साधारण ५१०.५ टन सोने बँकेने आपल्या देशातच ठेवले आहे. बाकीचे, म्हणजे सुमारे ३४५ टन सोने भारताने विदेशी बँकांमध्ये सुरक्षित ठेवले आहे. त्यातील बँक ऑफ इंग्लंडमध्ये ठेवलेले सोने रिझर्व्ह बँकेने अलीकडेच देशात परत आणले. भारतीय अर्थव्यवस्था मजबूत व्हावी म्हणून हा निर्णय घेतला गेला आहे.

शेअर बाजार, म्युच्युअल फंड आणि इतर आर्थिक साधनांसारखे गुंतवणुकीचे पर्याय निर्माण होण्याच्या आधीपासूनच भारतात संपत्ती जमवण्यासाठी सोने हा एक पसंतीचा मार्ग मानला आहे. भारतात महागाई किंवा इतर कोणत्याही आर्थिक अनिश्चिततेपासून बचाव करण्यासाठी सोन्याकडे एक सुरक्षित पर्याय म्हणून पाहिले जाते. जगात अमेरिकेकडे सोन्याचा सर्वाधिक साठा आहे. तो ८१३३.४६ टन एवढा आहे. त्यानंतर जर्मनी, इटली आणि फ्रान्स यांचा क्रमांक लागतो. ८५५.७३ टन सोन्यासह भारताचा आठवा क्रमांक आहे. भारत सातत्याने सोने खरेदी करत असल्यामुळे ८४५.९७ टन सोन्याचा साठा असलेल्या जपानला मागे टाकून भारताने आठव्या क्रमांकावर झेप घेतली आहे. आश्चर्य म्हणजे, एका अंदाजानुसार भारतीय कुटुंबाकडे असलेले 'घरगुती सोने' सुमारे २७ हजार टन आहे. हे सोने

जगातील कोणत्याही देशाच्या सोन्याच्या साठ्यापेक्षा कित्येक पटींनी अधिक आहे. जागतिक अर्थव्यवस्थेतही सोन्याला तेवढेच महत्त्व आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवरील घडामोडींमुळे अलीकडे



डॉलरचे स्थान डळमळीत होऊ लागले आहे. वाढत चाललेली महागाई, जागतिक बाजाराला लागलेले युद्धांचे ग्रहण आणि जागतिक मंदीची भीती यामुळे जगातले सर्वच देश आता सोने खरेदी करू लागले आहेत. या वर्षी एप्रिल ते सप्टेंबर या काळात आरबीआयने ३२ टन सोने खरेदी केले आहे. भारताची आर्थिक स्थिती चांगली असल्याचेच हे निदर्शक आहे. त्यामुळे आपल्या देशाच्या एकूण चलनसाठ्यातील सोन्याचा वाटा ८.१५ टक्क्यांवरून ९.३२ टक्क्यांपर्यंत वाढला आहे. भारताकडे सध्या ८०० टनांपेक्षा अधिक सोने आहे. यातील ३०० टनांहून अधिक सोने देशातच ठेवले आहे तर इतर सोने हे देशाबाहेर, इतर देशांच्या मध्यवर्ती बँकांमध्ये सुरक्षित ठेवले आहे. भारताचे सोने हे ब्रिटन आणि अमेरिकेत ठेवण्यात आले आहे. जगभरातील अनेक देश ब्रिटनच्या बँक ऑफ इंग्लंड या बँकेत सोने ठेवतात. धोका कमी करण्याच्या हेतूने सर्व देशांच्या मध्यवर्ती बँका आपले सोने सुरक्षिततेच्या हेतूने वेगवेगळ्या देशांच्या बँकांमध्ये ठेवतात. त्यामुळे कोणत्याही आपत्तीच्या काळात राजकीय आणि आर्थिक परिस्थिती बिघडली तरी परदेशात ठेवलेले सोने सुरक्षित राहते. नैसर्गिक आपत्तींमुळेही सोन्याच्या साठ्याचे नुकसान होऊ शकते. परदेशात सोने ठेवल्याने देशातील आपत्तीच्या काळातही आपले काही सोने सुरक्षित राहील याची खात्री असते. स्वातंत्र्यापूर्वी ब्रिटनने भारताचे सोने बँक ऑफ इंग्लंडमध्ये ठेवले होते. त्यामुळे स्वातंत्र्यानंतरही भारताने बँक ऑफ इंग्लंड आणि बँक फॉर इंटरनॅशनल सेटलमेंट्स (बीआयएस) यांच्याकडेच आपले सोने ठेवले. या बँकांमध्ये भारताचे ३२४.०१ मेट्रिक टन सोने सुरक्षित ठेवले होते, तर २०.२६ मेट्रिक टन सोने ठेवींच्या स्वरूपात ठेवण्यात आले होते, असे रिझर्व्ह बँकेने म्हटले आहे. १९९१ मध्ये एक वेळ अशी होती की भारताकडे आयात करण्यासाठी कोणतेही परकीय चलन शिल्लक नव्हते. आत्यंतिक गरजेमुळे भारताला आपले सोने गहाण ठेवून कर्ज घ्यावे लागले होते. त्यावेळी भारताने ४७ टन सोने गहाण ठेवले आणि २.२ अब्ज डॉलर्सचे कर्ज घेतले होते. माजी राज्यपाल सी. रंगराजन यांनी त्यांच्या पुस्तकात म्हटले आहे की, सरकारने सोने गहाण ठेवण्याचा निर्णय घेतला होता. मुंबई विमानतळावर चार्टर विमान उभे होते. ४७ टन सोने या विमानात ठेवण्यात आले होते. हे सोने घेऊन विमान इंग्लंडला गेले. त्यानंतरच भारताला कर्ज मिळाले. अर्थात त्यानंतर भारताने गहाण ठेवलेले सोने सोडवलेच, पण परकीय चलनाचा साठाही वाढवला; परंतु कर्ज संपले तरी सोने मात्र तिथेच होते. तेच सोने आता परत आणले जात आहे. हे सोने आताच परत आणण्यामागे दोन हेतू आहेत. एक म्हणजे आज भारताची आर्थिक स्थिती अत्यंत चांगली आहे. आज भारताची परकीय गंगाजळी ६८८ बिलियन डॉलर्स म्हणजे भारताच्या ११ महिन्यांच्या आयातीसाठी पुरून उरेल एवढी आहे. दुसरी गोष्ट म्हणजे सध्या सुरू असलेल्या इस्रायल तसेच युक्रेन आणि रशियाच्या युद्धपरिस्थितीमुळे एकूणच अर्थव्यवस्था आणि राजकारण सातत्याने बदलते आहे. युद्ध सुरू झाल्यानंतर पाश्चात्त्य देशांनी रशियाच्या एकूण संपतीच्या ५० टक्के म्हणजे सुमारे ३०० बिलियन डॉलर्सची संपत्ती सध्या गोठवून ठेवली आहे. त्यात सोने आणि डॉलर्सच्या स्वरूपातली करन्सी आणि असेट्स आहेत. त्यामुळे रशिया आज स्वत:चेच पैसे वापरू शकत नाही. सध्या भारत आणि ब्रिटन यांचे संबंध चांगले आहेत; परंतु राजकीय गणिते कशी आणि केव्हा बदलतील हे कुणालाही कधीच सांगता येत नाही. त्यामुळे काळजी घेतलेली कधीही चांगलीच. आरबीआयने याच वर्षी मेमध्ये देखील १०० टन सोने भारतात आणले असून आता नुकतेच, म्हणजेच धनत्रयोदशीच्या दिवशी १०२ टन सोने लंडनहून भारतात आणले. अजूनही इतकेच टन सोने भारतात आणण्यात येणार आहे.

अर्थातच हे सर्व सोने आपलेच आहे, जे आजवर लंडनच्या बँकेत होते. हे १०० टन सोने भारतात आणण्यासाठी अनेक महिन्यांचे नियोजन करण्यात आले. अर्थ मंत्रालय, आरबीआय आणि सरकारच्या इतर शाखांसह स्थानिक अधिकारी नियोजन आणि अंमलबजावणीमध्ये गुंतले होते. शंभर टन सोने एका देशातून दुसऱ्या देशात हलवणे हे काही सोपे काम नाही. त्यासाठी मोठी सुरक्षा व्यवस्था उभारणे गरजेचे होते. युक्रेन, इस्त्राईल या भागात युद्धे सुरू आहेत तर भारतासाठी इतर दहशतवादी संघटनांचे आव्हानही आहेच. शंभर टन म्हणजे जवळपास दहा मोठे ट्रक भरेल इतके सोने ते वाहून आणण्यासाठी २० मोठ्या हत्तींइतक्या जागेची गरज आहे. त्याचे बाजारातील मूल्य जवळपास ८.५ अब्ज डॉलर म्हणजे ७,०९,२२,०८,७५,००० रुपये होते. विशेष म्हणजे भारतात सोने आणण्यासाठी आरबीआयने सीमा शुल्कात सूट दिली आहे; परंतु आयातीवर लावण्यात आलेल्या एकात्मिक जीएसटीमध्ये मात्र कोणतीही सूट देण्यात आलेली नाही. कारण हा कर राज्यांशी सामायिक केला जातो. हे सोने आणण्यासाठी भारतीय वायुसेनेच्या सी १७ ग्लोबमास्टर या भारताच्या सर्वात मोठ्या मालवाहतूक विमानाचा वापर करण्यात आला. ते एका वेळी ८० टन वजन वाहू शकते. भारतीय वायुसेनेकडे अशी ११ विमाने आहेत. अत्यंत गोपनीयतेने आणि कडेकोट सुरक्षेत हे शंभर टन सोने भारतात परत आणण्यात आले. मुंबईतील मिंट रोडवरील रिझर्व्ह बँकेच्या जुन्या कार्यालयाच्या इमारतीत सोने ठेवले जाते. याशिवाय नागपुरातील तिजोरीतही पूर्ण सुरक्षेसह सोने ठेवले जाते. आता आणलेले सोनेदखील याच दोन्ही तिजोरींमध्ये ठेवण्यात आले आहे. सोने ही अत्यंत सुरक्षित संपती आहे. ते अस्थिर संपत्तीच्या श्रेणीत मोडत नाही. सोन्याला संपूर्ण जगात सर्वाधिक लिक्विडिटी (तरलता) आहे असे मानले जाते. सर्वात महत्त्वाचे म्हणजे युद्ध किंवा आर्थिक संकटाच्या काळात सोने स्थिर राहते किंवा त्याच्या किमती वाढतात. त्यामुळे भारतीयच नव्हे तर, सारे देशही सुरक्षित गुंतवणुकीसाठी सोन्याचाच पर्याय निवडतात हे आजवर अनेकदा सिद्ध झाले आहे.

# कडबगाव ग्रामपंचायतीमध्ये सरपंच ग्रामसेवक यांचा मनमानी कारभार !

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/अक्कलकोट : अक्कलककोट तालुक्यातील मौजे कडबगांव ग्रामपंचायती मध्ये सध्या सरपंच आणि ग्रामसेवक यांनी कोणत्याही सदस्यना विचारात न घेता मनमानी कारभार चालू आहे ग्रामपंचायतिचे मासिक मिटिंग न घेता परस्पर ठराव देणे. रजिस्टर परस्पर घरी घेऊन जाणे सदस्यांना खोटी माहिती देऊन सह्या घेणे, दिवा बत्ती न लावणे, गावांतर्गत गटार न काढणे अशा अन्य प्रकारचे मनमानी कारभार चालू आहे.

गावातील विकास कामे ही अत्यंत निकृष्ट दर्जाची केली आहेत त्यामुळे बांधकाम विभागातील ग.ए. श्री बशेट्टी साहेब कोणत्याही कामावर व्हिजिट करत नाही त्यामुळे कडबगावची जनता ग.ए. बशेट्टी यांची बदली ची मागणी करत आहेत. अशी मगणी गटविकास अधिकारी पंचायत समिती अक्कलकोट यांच्या कडे मागणी करण्यात आली आहे या मागणी ची दखल घेतली गेली नाही तर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल.




ग ए बशेठी यांच्या कामावर कडबगाव चे ग्रामस्थ तीव्र नाराज, गट विकास अधिकारी यांच्या कडे केली बदलीची मागणी केली आहे.

# सुनेशी का बोलतो असे विचारल्यामुळे एकास मारहाण, गुन्हा दाखल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (प्रतिनिधी) तू माझ्या सुनेशी का बोलतो असे म्हणून एकास मारहाण केल्याची घटना जुना विडी घरकुल येथे घडली.याबाबत पन्नालाल सिद्राम बुगडे (रा.योगेश्वर नगर जुना विडी घरकुल) यांनी तुकाराम कस्सा याच्या विरोधात फिर्याद दिली आहे.संशयित आरोपी कस्सा हा फिर्यादीच्या सुनेशी बोलत असताना त्याने तू माझ्या सुनेशी का बोलतो.असे विचारले असता




संशयित आरोपीने फिर्यादीस काय रे म्हाताऱ्या, तुला हे लय माज आला आहे का? असे म्हणून शिवीगाळ,दमदाटी करून घराच्या लाकडी दरवाजाला धक्के देत कडी तोडली.व तोंडावर छातीवर मारून जखमी केली.एमआयडीसी पोलीस ठाण्यात तुकाराम कससा याच्या विरोधात गुन्हा दाखल झाला आहे.घटनेचा अधिक तपास पोलीस हवालदार नवले करत आहेत.

# दहिटणे गावच्या उपसरपंचपदी विकिबाबा चौधरी यांची बिनविरोध निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/अक्कलकोट : आज रोजी दहिटणे गावच्या ग्रामपंचायत उपसरपंच निवडणुकी दरम्यान तालुक्याचे विस्तार अधिकारी पठाण साहेब व आपल्या गावचे ग्रामसेवक पवार साहेब त्यांच्या नेतृत्वाखाली निवडणूक पार पडली या निवडणूक मध्ये उपसरपंच पदासाठी गावचे ग्राम पंचायत सदस्य विकी नारायण चौधरी यांचा एकमेव अर्ज दाखल झाला असल्याने त्यांचे बिनविरोध उपसरपंचपदी निवड करण्यात आली..

निवड प्रक्रिया दरम्यान आपल्या गावचे प्रथम नागरिक सरपंच नितीन दादा मोरे,



पंडीत मोरे सर चन्नवीर बोदले, दौलतराव मोरे, दिगंबर राजेगावकर, विलास भस्मे, अन्सर मामा शेख, पोलीस पाटील भिम म्हैत्रे, श्रीकांत चौधरी, राजेंद्र मोरे सर, बसवराज चक्रे, सेकुंबर मुजावर, व सर्व ग्रामपंचायत सदस्य आणि गावातील इतर नागरिक उपस्थित होते.

# रिपाइं (आठवले) च्यावतीने शहीद सोमनाथ सुर्यवंशी व जेष्ठ पँथर नेते विजय वाकोडे यांना नळदुर्ग येथे आदरांजली

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस.के.गायकवाड : नळदुर्ग ता.तुळजापूर येथे परभणी येथील शहीद सोमनाथ सुर्यवंशी व जेष्ठ पँथर नेते विजय वाकोडे (बाबा) यांना रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) च्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली.



परभणी येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्या जवळ लावण्यात आलेल्या संविधानाच्या उद्देशिकेची मोडतोड करून संविधानाचा अवमान केल्याप्रकरणी संविधान प्रेमी आंबेडकर वादी जनतेनी काढलेल्या निषेध मोर्चास वेगळे वळण देवून परभणी येथील पोलिस प्रशासनाने बेकायदेशीर ऑपरेशन कोबींग करुन आपापल्या घरी बसलेल्या आंबेडकरी चळवळीतील

**सोमनाथ सुर्यवंशी यांचा बळी घेणाऱ्या संबंधित पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांवर मनुष्य वधाचा गुन्हा दाखल करावा रिपाइंची मागणी**

कार्यकर्ते आणि महिलाना बेदम मारहाण करून कार्यकर्त्यांवर गुन्हे दाखल करून पोलीस कोठडीत टाकले.

पोलीसानी केलेल्या मारहाणीत संविधान प्रेमी आंबेडकरवादी बुध्दीजीवी कार्यकर्ता सोमनाथ सुर्यवंशी यांचा बळी गेला असून शहिद सोमनाथ सुर्यवंशी यांना तुळजापूर तालुक्यातील नळदुर्ग येथे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) च्या वतीने भावपूर्ण आदरांजली वाहण्यात आली असून बेकायदेशीर मारहाण करून सोमनाथ सुर्यवंशी यांचा बळी घेणाऱ्या संबंधित पोलिस अधिकारी आणि कर्मचारी यांच्यावर मनुष्य वधाचा गुन्हा दाखल करावा अशी मागणी श्रद्धांजली सभेच्या माध्यमातून कार्यकर्त्यांनी केली आहे.

तसेच याप्रसंगीआंबेडकरी चळवळीतील लढवय्या पँथर जेष्ठ कार्यकर्ते विजय वाकोडे (बाबा) यांच्या दु:खद निधनाबद्दल त्यांना ही भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बौद्ध विहार कमिटी नळदुर्ग चे जेष्ठ कार्यकर्ते प्रकाश गायकवाड हे होते.यावेळी रिपाइं (आठवले) चे बाबासाहेब बनसोडे, अरुण लोखंडे,एस.के.गायकवाड, राजेंद्र शिंदे,सुरेश लोंढे, अहमद शेख,दत्ता बनसोडे,बाळू गवळी,डीबीएम.संस्थेचे तालुका अध्यक्ष उमेश गायकवाड, उपाध्यक्ष सिध्दार्थ बनसोडे, बहुजन रयत परिषदेचे,धर्मराज देडे सह कार्यकर्ते उपस्थित होते.

# अक्कलकोटचे सुपुत्र डॉ.अरुण सोनकांबळे युपीएससी परीक्षा उत्तीर्ण; केंद्रिय मंत्रालयात निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनीधी : अक्कलकोट तालुक्यातील किणी गावचे सुपुत्र डॉ. अरुण सोनकांबळे यांची भारत सरकारच्या श्रम व रोजगार मंत्रालयात एझक्र्ज मध्ये ज्युनिअर ट्रान्सलेटर ऑफिसर म्हणून निवड झाली आहे त्यांची निवड केंद्रिय लोकसेवा आयोग णझडउ मधून झालेली आहे ते NET SET JRF PHD धारक असून वाई येथे अध्यापनाचे कार्य करत होते पहिल्याच प्रयत्नात त्यांनी यश संपादन केल्याने सर्वत्र त्यांचे अभिनंदन होत आहे.

या निवडीने केंद्रिय मंत्री ना.रामदास आठवले,राजाभाऊ सरवदे, अक्कलकोटचे आमदार




सचिन कल्याणशेट्टी, अविनाश मडीखांबे , सिद्धू टाके यश सिद्धीचे संपादक कमलाकर सोनकांबळे अक्कलकोट तालुक्यातील आंबेडकरी चळवळीतील अनेक मान्यवर तसेच यांचे परम मित्र प्रा.राहुल रूही बंधू सागर सोनकांबळे , कुटुंबीय मित्रपरिवार समाजबांधव यांनी डॉ.अरुण सोनकांबळे यांचे अभिनंदन करून आनंद साजरा केला आहे

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# जातनिहाय जनगणना करून आरक्षणाचा प्रश्न निकाली काढावा

## माढाचे आ. अभिजीत पाटील यांनी मांडले लोकहिताचे अनेक प्रश्न; एमआयडीसीचा लवकरच प्रश्न मार्गी लागणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

माढा/प्रतिनिधी : माढा विधानसभा मतदारसंघांमध्ये , मागील ३०वर्षांची सत्ता उलटून टाकत मतदार संघात परिवर्तन घडवले आहे. आमदार अभिजीत पाटील यांना आमदार केल्याची कसर न राखण्यासाठीच आ.पाटील यांनीही नागपूर येथील हिव-ाळी अधिवेशनात आक्रमकपणे विविध प्रश्न मांडत त्याची सोडवणूक होण्याच्या दृष्टीने तयारी ठेवली आहे.

### माढा शहराच्या पाणी प्रश्नाला पहिल्याच दिवशी घातला हात

माढा पंढरपूर विधानसभा मतदार संघातून विकासाचे व्हिजन असणारे लोकप्रतिनिधी पाठविण्याचे काम विधानसभा निवडणुकीत मतदारांनी केले आहे. त्यामुळेच आमदार अभिजीत पाटील यांनी केवळ विकास आणि विकास यासाठीच आपली आमदारकी पणाला लावण्याचा निर्णय घेतला आहे.

बुधवारी झालेल्या नागपूर येथील पहिल्याच भाषणात अगदी मुद्देसूरपणे आपल्या मतदार संघातील विकासासह राज्यातील मराठा, धनगर, लिंगायत, महादेव कोळी, मुस्लिम या विविध जातीच्या आरक्षण संदर्भात योग्य मार्ग काढण्यासाठी राज्यात जातनिहाय जनगणना करण्याची मागणी केली आहे.

मराठा आ-रक्षण प्रश्नाचे मागील अनेक दिवसापासून मनोज जरांगे पाटील यांच्या माध्यमातून आंदोलन केले जात आहे. आगामी २५ डिसेंबर रोजी पुन्हा एकदा आंदोलनाचा इशाराही देण्यात आला आहे. परंतु या आंदोलनाच्या इशाराकडे सरकारने गांभीर्याने पहिले नसून अभिभाषणात त्याबाबतीत कसलीही भूमिका मांडली नसल्याने आ. अभिजीत पाटील यांनी सरकारवर थेट नाराजी व्यक्त केली आहे. यामुळेच आ. अभिजीत पाटील यांच्यामुळे सरकारला आरक्षण प्रश्नातील होणाऱ्या आंदोलन प्रश्नांची आठवण करून देण्याचे काम खुद्द आ. अभिजीत पाटील यांनी केले आहे. यामुळेच मराठा समाजाला दिलेल्या शब्द पाळण्यासाठी आ. अभिजीत पाटील यांचा पहिल्यापासूनच पाठपुरावा सुरु झाला असल्याचे स्पष्ट दिसले आहे.

### एम एस पी वाढविण्यासाठी पाठपुरावा व्हावा

**आपल्या महाराष्ट्र राज्यात साखर कारखाने मोठ्या प्रमाणात आहेत. याच उद्योगावर राज्यातील मोठं आर्थिक गणित अवलंबून आहे. यासाठी हा साखर उद्योग चालविणे गरजेचे आहे. ऊस उत्पादक शेतकरी यांना लाभ होण्यासाठी साखरेचे भाव वाढविणे आवश्यक आहेत. तरच उसाला भाव वाढ देणे शक्य असते. यासाठी आपल्या राज्य सरकारकडून केंद्र सरकारला एम एस पी वाढविण्यासाठी प्रयत्न होणे आवश्यक असल्याची मागणी माढाचे नूतन आमदार अभिजीत पाटील यांनी अधिवेशनात केली आहे.**

माढा मतदार संघातील माढा शहरमध्ये दहा दिवसातून पाणी मिळते. याबाबत उजनी धरण या माढा तालुक्यात असूनही अशी वाईट अवस्था का? असा प्रश्न मांडत हा पाणी प्रश्न सोंडविण्याबाबत मागणी केली आहे. सरकारने शहरा बरोबरच ग्रामीण भागाचा विकास करण्यासाठी पावले उचलली पाहिजे. याकरिता आपल्या मतदारसंघात असलेल्या मेंढापूर आणि मोडनिंब येथील एमआयडीसीला लवकरात लवकर मान्यता दिल्यास या भागाचा मोठा विकास होईल असेही सांगितले.

यासह विविध प्रश्नावर आ. अभिजीत पाटील यांनी आवाज उठवीत आपण माढा मतदार संघाला विकासाच्या दिशेने घेवून जाऊ शकतो हे दाखवून दिले आहे.

पहिल्या दिवशी सदनाच्या पायऱ्यांवर मी डोके टेकवले. कारण पंढरपूरच्या विठ्ठलाच्या दर्शनासाठी जाताना ज्या पवित्र भावना मनात येतात त्याच भावना त्या वेळी आल्या. इथे आपण कशासाठी आलो आहोत ही जाणीव कायम माझ्या मनात आहे.. जी कदाचित आपल्या मनात देखील राहील.. तुकोबांच्या शब्दात सांगायचे झाले तर...

**उजळावया आलों वाटा ।**
**खरा खोटा निवाडा ।।१।।**
**बोलविले बोलें बोल ।**
**धनी विठ्ठल सन्निध ।।ध्रु.।।**

मी भविष्याकडे जाणारे मार्ग उजळविण्यासाठी येथे आलो आहे. सत्य असत्य सांगून महाराष्ट्राच्या प्रगतीमध्ये माझा वाटा उचलण्यासाठी आलो आहे. येथे बोलणारा प्रत्येक बोल विठ्ठलाच्या आणि मतदारसंघातील मायबाप जनतेच्या मनातील असेल अशी ग्वाही या वेळी मी देतो आणि सरकारनेही ती दिली पाहिजे.



महाराष्ट्र विधानसभा ( हिवाळी अधिवेशन, डिसेंबर -२०२४ ) थेट प्रक्षेपण

## थोडक्यात...

### तलाठी पदाची नोकरी लावतो म्हणून ४ लाखाची फसवणूक

**सोलापूर** : आतापर्यंत मी भरपूर लोकांना सरकारी नोकऱ्या लावून दिल्या आहेत.तुला सुद्धा सोलापुरात सरकारी नोकरी लावून देतो.असे म्हणून ४ लाख १५ हजार रुपये घेऊन आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी अनिल छोटेलाल व्यास (रा.अंबिका हॅट्स मॅक्स हॉस्पिटल जवळ वडोदरा,सुरत गुजरात सध्या.सोलापूर) याच्या विरोधात फौजदार चावडी पो-लीस ठाण्यात दाखल गुन्हा झाला आहे. या घटनेच्या हकीकत अशी की, फिर्यादी मयुरी सागर भोसले (रा.जुनी पोलीस लाईन मुरारजी पेठ,सोलापूर) व त्यांच्या ओळखीचे इर्शाद युसुफ शेख यांना संशयित आरोपी अनिल व्यास याने फिर्यादीस तू सोलापुरात राहूनच सरकारी नोकरी का करत नाही.तुझे शिक्षण चांगले आहे.तुझ्या सर्व अडचणी ही दूर होतील.माझ्या मोठ्या लोकांशी ओळखी आहेत.आणि मी तुला चांगल्या सरकारी उच्च पदावर नोकरी मिळवून देतो.मी भरपूर लोकांना सरकारी नोकरी मिळवून दिली आहे.असे आमिष दाखवून तलाठी पदासाठी नोकरी लावतो असे म्हणून फिर्यादी कडून ऑनलाईन व सोने गहानवाट ठेवून २ लाख ८० हजार रुपये तसेच इर्शाद शेख याच्याकडून २ लाख ७० हजार रुपये घेतले.वर्षभर वाट पाहुन नोकरी मिळाली नाही.याबाबत दोघांनी व्यास याच्याकडे नोकरी बाबत विचारणा केली असता संशयित आरोपी व्यास यांनी उलट दोघांना दमदाटी केली.अशा आशयाची फिर्याद फौजदार चावडी पोलीस ठाण्यात नोंदवली आहे.दरम्यान व्यास हा एक राजकीय पक्षाचा कार्यकर्ता असल्याचे कळते.या घटनेचा अधिक तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक जाधव हे करत आहेत.

# मारहाण करून दरोडा टाकल्या प्रकरणी सारोळे ता.मोहोळ येथील ४ जणांचे गुन्हा केल्याचे सिद्ध न झाल्याने निर्दोष मुक्तता

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/अक्कलकोट : मारहाण करून दरोडा टाकल्या प्रकरणी सारा-ळे ता.मोहोळ येथील सिताबाई गायकवाड,अशोक सुतकर,मधुकर बनसोडे,कृष्णा,गायकवाड,शुभम काटे याची गुन्हा केल्याचे सिद्ध न झाल्याने निर्दोष मुक्तता करण्यात आली

हकीकत फिर्यादी अनंतकुमार शिंदे व आरोपी सिताबाई गायकवाड अन्य ५ जण, सारा-ळे अन मोहोळ रहिवसी आ-हेत. दि. २४/७/२०२१ रोजी सकाळी ११.३० वा. फिर्यादी यांच्या शेतातील वस्तीवर गेले. माजी सैनिक अशोक सुतकर सिताबाई गायकवाड आणि फिर्यादी अनंतकुमारचा शेतीच्या कारणावरून वाद सुरु झाला फिर्यादी. अनंतकुमारचा खिशातून २०००/ रु काढुन घेऊन ताई शिंदेच्या गलेतील सोन्या बोरमाळ, प्रशांत ऊर्फ सोन्या यांच्या बोटातून सोन्याची अंगठी काढुन जिवे ठार मारण्याचा धमकी. देते जबर मारहाण केली सदर बाबत मोहोळ पोलिस ठाण्यात फिर्याद देण्यात आली होती सदर फिर्यादी वरूनस डि.एस.पी. प्रभाकर शिंदे यांनी सखोल तपास करून भा.द.वि. कलम ३९५,५०४,५०६,३३ अन्वये आरोपींविरुद्ध दोषारोप दाखल केले होते.

सदर खटला जिल्हा व सत्र न्यायाधीश आर जे कटारिया यांच्या समोर सुनावणी होऊन सरकार पक्षा तर्फे एकुण ५ साक्षीदार तपासण्यात आले,बचाव पक्षाचे वतीने अॅड राजेंद्र फताटे यांनी फिर्यादी अनंतकुमार यांनी आरोपी हे अशिक्षित असल्याची गैर फायदा घेत १ एकर ऐवजी २.५ एकर शेतजमीन दिशाभूल करून खरीदी करून घेतली होती त्याबाबत विचारणा केली असता उलट आरोपींना मारहाण करून हाकलून दिले, तसेच उलट तपासात तपास अधिकारी यांनी तपासात आरोपींविरुद्ध कोणताही पुरावा मिळुन आले नाही असे मान्य केल असे युक्तिवाद केले सदर युक्तिवाद ग्राह्य धरून न्याय मुर्तीं यानी सर्व आरोपींचा निर्दोष मुक्त केले सदर खटल्यात आरोपी तर्फै अँड राजेंद्र फताटे तर सरकारकडून प्रकाश जन्नु यांनी काम पाहीले.



# विद्यार्थ्यांनी ज्ञान व विज्ञानाची कास धरावी : एस.के. शिंदे



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : विद्यार्थ्यांमध्ये कल्पकता, नवनिर्मितीक्षमता आणि वैज्ञानिक दृष्टिकोनाला प्रोत्साहन देण्यासाठी शालेय स्तरावर विज्ञान प्रदर्शनासारखे उपक्रम राबविले जातात. आजच्या माहिती तंत्रज्ञानाच्या युगात जीवना-तील प्रत्येक गोष्टीत विज्ञान आहे, ते शोधण्यासाठी विद्यार्थ्यांनी ज्ञान आणि विज्ञानाची कास धरावी असे प्रतिपादन प्राचार्य एस. के शिंदे यांनी केले.

म्हाळसाकोरे येथील आरूढ विद्यालयात शालेय स्तरावरील विज्ञान मेळावाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते . कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रकाश पा.बाजारे होते.

यावेळी मेळाव्यासाठी माध्यमिक शालेय समिती अध्यक्ष प्रकाशभाऊ बाजारे, उच्च माध्यमिक शालेय समिती अध्यक्ष अंबादास गवारे , उपमुख्याध्यापिका श्रीमती एम. के. आहेर, पर्यवेक्षक जी. एम. पोटे, पालक व ग्रामस्थ उप-स्थित होते. या सर्व मान्यवरांचे प्राचार्य शिंदे यांनी स्वागत केले. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते सरस्वती, डॉ. सी. व्ही. रमण यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले असून प्रमुख अतिथी प्रकाश बाजारे व अंबादास गवारे यांच्या हस्ते बालवैज्ञानिकांनी सादर केलेल्या वैज्ञानिक रांगोळ्या आणि विद्यालयाच्या प्रांगणातील डॉ . सी. व्ही. रमण नगरीतील प्रयोगशील प्रतिकृती प्रदर्शन दा-लनाचे औपचारिक उद्घाटन केले.

### आरूढ विद्यालयात शालेयस्तरीय विज्ञान प्रदर्शन

प्रदर्शनामध्ये अन्न, आरोग्य, स्वच्छता, शेती यावर आधारित कल्पक प्रकल्पांचा समावेश होता. प्रमुख मान्यवरांनी विज्ञान प्रतिकृती संदर्भात विचारलेल्या प्रश्नांना विद्यार्थ्यांनी समर्पक उत्तरे दिली.

विद्यालयाच्या विज्ञान शिक्षिका श्रीमती एच. व्ही. गोसावी यांनी मनोगत व्यक्त केले. प्रमुख अतिथी प्रकाश बाजारे यांनी आपल्या मनोगतातून सहभागी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. विज्ञान प्रदर्शनात प्राथमिक व उच्च प्राथमिक विभागाचे ३५, माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागाचे २५ अशा एकूण ६०वैज्ञानिक प्रतिकृती प्रदर्शनात ठेवल्या होत्या. प्रदर्शनातील वैज्ञानिक प्रतिकृतींचे व रांगोळी प्रदर्शनाचे , शितल मुठाळ व निकिता कारे यांनी परीक्षक म्हणून काम केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विक्रम जाधव यांनी केले तर आभार एस. व्ही . गिरी यांनी मानले. प्रदर्शन यशस्वीतेसाठी विज्ञान शिक्षक संजय भोई, श्रीमती एच. व्ही. गोसावी, पी.आर. बोरसे , एस.व्ही. गिरी, व्ही. एस. मिंचे, व्ही. एस. राजोळे यांनी परिश्रम घेतले.

**स्वेरीत आंतरराष्ट्रीय परिषद 'टेक्नो-सोसायटल २०२४' चा समारोप** | **डॉ.साक्षी ढाणेकर यांचे प्रतिपादन**

# 'टेक्नो-सोसायटल २०२४' सारख्या परिषदा वारंवार व्हाव्यात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : 'टेक्नो-सोसायटल २०२४' सारख्या आंतरराष्ट्रीय परिषदेमुळे संशोधक विद्यार्थ्यांना नवनिर्मिती करण्यासाठी चालना मिळाली असून अशा परिषदा वारंवार व्हाव्यात. त्यामुळे संशोधनास अधिक गती मिळेल व भविष्यात भारतीय संशोधनामध्ये प्रगती होऊ शकेल. स्वेरीला येणे ही नेहमीच सन्मानाची बाब असते. स्वेरीला ही माझी तिसरी भेट आहे. सर्व विद्यार्थी, संशोधक, प्राध्यापक यांना भेटण्याची संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल स्वेरीचे आभार! ज्ञानाची देवाण-घेवाण होण्यासाठी अशा कॉन्फरन्सची आवश्यकता असते.' असे प्रतिपादन आयआयटी जोधपुरच्या डॉ. साक्षी ढाणेकर यांनी केले.







गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरींगमध्ये स्कूल ऑफ लाईफ सायन्सेस, पु. अ. हो. सोला-पूर विद्यापीठ, सोलापूर व स्वेरी, पंढरपूर यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच पु. अ. हो. सोलापूर विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर यांच्या सहकार्याने पीएम- उषा या योजनेअंतर्गत आयोजिलेल्या पा-चवी आंतरराष्ट्रीय परिषद 'टेक्नो-सोसायटल २०२४' च्या समारोप प्रसंगी आयआयटी जोधपुरच्या डॉ. साक्षी ढाणेकर ह्या मार्गदर्शन करत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पू.अ.हो. सोलापूर विद्यापीठाचे प्र. कुलगुरू डॉ. लक्ष्मीकांत दामा हे होते. सुरवातीला 'टेक्नो-सोसायटल २०२४' चे समन्वयक डॉ. अमरजित केने यांनी दोन दिवस चाललेल्या परिषदेमधील विशेष नोंदी, सहभागी स्पर्धक, सादर केलेले पोस्टर्स, मागील चारही परिषदेच्या तुलनेत यंदा मिळा-लेला अभूतपूर्व प्रतिसाद, संशोधक पाहुण्यांची रेलचेल, नियोजन करताना झालेली तारेवरची कसरत आदी लक्ष-वेधी बाबींवर प्रकाश टाकला. स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांनी 'टेक्नो-सोसायटल २०२४' या परिषदेला दिलेल्या प्रतिसादाबद्दल विविध देशांतून, भारताच्या विविध राज्यांतून आलेले संशोधक, प्राध्यापकांचे आभार मानले. आपल्या सहभागामुळे ही आंतरराष्ट्रीय परिषद यशस्वी झाली असून यासाठी सर्वांनी मनापासून सहकार्य केल्याचे सांगितले. भविष्यात स्टार्टअप, स्कील इंडीया, मेकइन इंडीया, प्रोडक्ट डेव्हलपमेंट असे विविध प्रकल्प व योजना वेग घेतील, असेही त्यांनी आवर्जून सांगितले.

यावेळी प्रमोद मलिक (भुवनेश्वर), डॉ. रामदास बिरादार (पिंपरी चिं-चवड), शिवानी कांबळे, प्रा. ए. आर. शेलार या संशोधक स्पर्धकांनी परिषदेच्या उत्तम नियोजनाचे कौतुक केले. या परिषदेच्या माध्यमातून नवनवीन बाबी शिकण्यास मिळाल्याचे त्यांनी सांगितले.

स्वेरी ग्रामीण भागात असूनही शहराला लाजवेल असे नियोजन केल्याचे त्यांनी सांगितले. एचसीएल कंपनीचे योगीराज दामा म्हणाले की, 'अशा स्पर्धेमुळे संशोधक मनापासून व पोटतिडकीने परिश्रम घेवू लागतो व अभ्यासपूर्ण प्रकल्प सादर करतो आणि यातून त्यांच्या बौद्धिक क्षमतेचा विकास होतो.' अध्यक्ष स्थानावरून बोलताना प्र. कुलगुरू डॉ. लक्ष्मीकांत दामा म्हणाले की, ''टेक्नो-सोसायटल २०२४' च्या निमित्ताने गेल्या दोन दिवसांमध्ये आपण नवनवीन विचार शेअर केले, नाविन्यपूर्ण उपाय शोध-ले आणि तंत्रज्ञानाचा उपयोग करून सामाजिक आव्हानांना कसे सामोरे जावे यावर विचारमंथन केले. या परिषदेच्या माध्यमातून खऱ्या अर्थाने प्रगत संशोधनाला वास्तव जगाच्या वापरांसोबत जोडले गेले. आपल्या सक्रिय सहभागाने आणि मोलाच्या योगदानाने हा उपक्रम शैक्षणिक मर्यादांच्या पलीकडे जाऊन एक प्रभावी चर्चासत्र मंच बनला आहे. पंढरपूर ही आध्यात्मिकतेची पवित्र भूमी आहे, आणि ह्या परिषदेमुळे विचारशीलता, बौद्धिकता व तांत्रिक सहकार्यासाठी एक प्रेरणादायी केंद्र बनले आहे. डॉ. रोंगे सरांच्या समर्पणामुळे आणि विद्यार्थी व प्राध्यापकांच्या अथक मेहनतीमुळे हा उपक्रम यशस्वी झाला. समाजाच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी तरुण पिढीचा वाढता सहभाग या परिषदेत सिद्ध झाला. त्यामुळे आपल्या ज्ञानात भर टाकण्याबरोबरच, व्यावहारिक उपाय शोधण्यासाठी भक्कम पाया रचला आहे. वैज्ञानिक, अभियंते, धोरणकर्ते आणि नवनिर्माते यांच्यातील सहकार्याने प्रत्यक्ष जगा-तील समस्यांवर उत्तरे मिळविण्याचे महत्त्व या परिषदेत अधोरेखित झाले आहे'. यावेळी पोस्टर स्पर्धेत शिल्पा पाटील (व्हीआयटी, पुणे), डॉ. तृप्ती बनसोडे (फॅब्रटेक, सांगोला), अमोल भोसले, (आरव्हीआयटीएम, बेंगलोर), प्रमोदकुमार मलिक, (केआयआयटी, भुवनेश्वर), योगेश जाधव (पू.अ.हो. सोलापूर विद्या-पीठ, सोलापूर) यांच्यासह अनेक युवा संशोधकांनी बक्षिसे पटकाविली. यावेळी पाहुण्यांकडून परिषदेत सहभागी झाल्याबद्धल प्रमाण-पत्रे देण्यात आली. पहिल्या दिवशी सायंकाळी राजू पुरंदरे यांच्या 'स्वर-संध्या' या सांस्कृतिक कार्यक्रमातून नव्या, जुन्या हिंदी, मराठी गीते सादर करण्यात आली. या सांस्कृतिक कार्यक्रमामुळे बाहेरून आलेल्या पाहुण्यांची चांगली करमणूक झाली. एकंदरीत ही दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषद विद्यार्थी, संशोधक, प्राध्यापक आणि भविष्यकालीन संशोधन या सर्व बाबतीत मोलाची ठरली हे मात्र निश्चित! 'टेक्नो-सोसायटल २०२४ ही पाचवी आंतरराष्ट्रीय परिषद यशस्वी होण्यासाठी स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली, स्वेरी कॅम्पस इन्च-ार्ज डॉ. एम. एम. पवार यांच्या सहकार्याने, उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार यांच्या नेतृत्वाखाली स्वेरीच्या सर्वच सदस्यांनी अहोरात्र परिश्रम घेतले. एमबीएच्या डॉ. मिनल भोरे यांनी सूत्रसंचालन केले तर पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्या-पीठ, सोलापूरच्या विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ.प्रशांत पवार यांनी आभार मानले.

## थोडक्यात...

### मार्केट यार्डात झोपलेल्या शेतकऱ्याचा मोबाईल पळविला

सोलापूर, (प्रतिनिधी) : मार्केट यार्डात एस.एन.जावळे यांच्या दुकानाजवळ झोपलेल्या शेतकऱ्याचा मोबाईल आज्ञात चोरट्याने पळविला.हकीकत अशी की, धुळोबा गणपत सोलंनकर (वय-३६,रा.गोंधळवाडी तालुका तुळजापूर) हा शेतकरी मार्केट यार्डात धान्य घेऊन आला होता.२३ नोव्हेंबर रोजी दुपारच्या सुमारास तो जावळे यांच्या दुकानाजवळ झोपी गेला असताना आज्ञात चोरट्याने महागड्या किमतीचा मोबाईल चोरून नेला. या घटनेची नोंद जेलरोड पोलीस ठाण्यात झाली आहे.

### पैशाकरिता विवाहतेचा छळ; चौघांवर गुन्हा

सोलापूर, (प्रतिनिधी) : माहेरकडून २ लाख रुपये घेऊन ये तरच तुला आम्ही नांदवतो. असे म्हणून मानसिक व शारीरिक त्रास देत शिवीगाळ करत मारहाण केल्याप्रकरणी पतीसह चौघांवर फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. हाकिकत अशी की, सरताप सैफ शेख (वय-२७ रा.क्रांतीनगर जवळ सोलापूर) या सासरी नांदत असताना पती सैफ शेख, ताहेरा शेख, सासरे रफीक शेख व दिर सोहेल शेख (रा.सर्वजण हजरत खान चाळ,सोलापूर) यांनी छळ केल्याप्रकरणी गुन्हा दाखल झाला आहे. अधिक तपास पो.ना. मुलाणी हे करत आहेत.

### दारू पाजून लोखंडी पाईपने मारहाण

सोलापूर, (प्रतिनिधी) : चल तेरे को काम दिलाता और दारू भी पिलता असे म्हणून दारू पाजून नंतर लोखंडी रॉडने मारहाण केल्याप्रकरणी तिघा विरोधात फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. फिर्यादी शुकुमार अझीम जमादार (वय-५५,रा.शास्त्रीनगर सोलापूर) हा कामावर जात असताना संशयित आरोपी नय्युम चांदसाब नदाफ (रा.पंजाब तालीम सोलापूर) व दोन अनोळखी इसम या तिघांनी मिळून फिर्यादीस रिक्षातून बाळीवेस येथे आणून दारू पाजली.व नंतर कामावर सोडण्यासाठी जात असताना जुना पुना नाका येथील ओढ्या जवळ रिक्षा थांबवुन तुझे जादा मस्ती है क्या असे म्हणून लोखंडी रॉडने हाता पायावर मारून गंभीर जखमी केले. फिर्यादी बेशुद्ध पडल्यानंतर तिघे फरार झाले. या घटनेची नोंद फौजदार चावडी पोलीस चौकी झाली आहे. या घटनेचा अधिक तपास साह.पोलीस निरीक्षक पाटील हे करत आहेत.

### मांजराच्या येण्या-जाण्याच्या कारणावरून शेजाऱ्यात भांडण

सोलापूर, (प्रतिनिधी) : शेजारी-शेजारी राहणाऱ्या दोन घरात मांजर येण्या-जाण्याच्या कारणावरून एका महिलेस मारहाण केल्याप्रकरणी ५ जणांच्या विरोधात गुन्हा दाखल झाले आहे. हकीकत अशी की, फिर्यादी मोलम्मा काशीम शेख (रा.सिद्धेश्वर पेठ,शहापूर चाळ,सोलापूर) हे न्यायालयात काम करत असताना फिर्यादीची आई यांनी फोन करून मांजर येण्याने जाण्याच्या कारणावरून शेजाऱ्यांनी भांडण सुरू केले आहे असे सांगितले. फिर्यादी आल्यानंतर रजिया पटेल, जावेद पटेल, शहिदा पटेल, मुस्कान पटेल, मुसेफ पटेल, व अखिया पटेल (रा.सर्व सोलापूर) यांनी केस ओढून मारहाण केली. तसेच भांडण सोडविण्यासाठी मधी पडलेल्या फर्जना यांनाही मारहाण केली.जेलरोड पोलीस ठाण्यात ५ जणांच्या विरोधात फिर्यादी दिली. त्यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल झाला आहे.तपास पोनि. जाधव हे करत आहेत.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते गृह विभागाच्या नवीन संकेतस्थळाचे अनावरण

## संकेतस्थळ आता माहितीजालकावर उपलब्ध; जलद दुवे उपलब्ध




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नागपूर/प्रतिनीधी : महाराष्ट्र शासनाच्या गृह विभागाच्या नवीन संकेतस्थळाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज येथे अनावरण करण्यात आले. www.home.maharashtra.gov.in या नावाचे अद्ययावत असे संकेतस्थळ आता माहितीजालकावर उपलब्ध झाले आहे.

मुख्यमंत्र्यांच्या रामगिरी शासकीय निवासस्थानी झालेल्या गृह विभागाच्या बैठकीत संकेतस्थळाचे अनावरण झाले. या बैठकीस राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक, गृह विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव डॉ आए. एस. चहल, पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला, मुख्यमंत्र्यांचे अतिरिक्त मुख्य सचिव विकास खारगे, मुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ श्रीकर परदेशी तसेच अन्य विविध विभागांचे अतिरिक्त सचिव, प्रधान सचिव तसेच गृह विभाग, पोलीस दलातील वरिष्ठ अधिकारी आदी मान्यवर उपस्थित होते.

हे नवीन संकेतस्थळ वापरकर्त्यासाठी सहज सुलभ करण्यात आले आहे. या संकेतस्थळावर विविध जलद दुवे उपलब्ध करून देण्यात आले आहेत. त्यामध्ये महाराष्ट्र कारागृह विभाग, महाराष्ट्र राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य उत्पादन शुल्क (ऑनलाईन सेवा), आपले सरकार, महाराष्ट्र राज्य पोलीस, बृहन्मुंबई पोलीस,महाराष्ट्र सागरी मंडळ, महाराष्ट्र शासन, मोटार वाहन विभाग, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सरदार वल्लभभाई पटेल राष्ट्रीय पोलिस अकादमी, केंद्रीय अन्वेषण ब्यूरो, पोलिस संशोधन केंद्र, (सीपीआर) पुणे, गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे, महाराष्ट्र सुरक्षा दल, मुंबई वाहतूक पोलिस, एनजेडीजी । राष्ट्रीय न्यायिक डेटा ग्रिड, देशाच्या सेवेत भारतीय पोलीस, राष्ट्रीय तुरुंग माहिती पोर्टल, ई-प्रोसिक्युशन आदी विभागांचे जलद दुवे उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

## मातंग युथ फेडरेशनच्या वतीने तहसीलदारांना निवेदन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे/बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी

परभणी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्या जवळील संविधानाची प्रतिकृती तोडणाऱ्या माथेफिरू नराधमावर कायदेशीर कारवाई करण्यात यावी. तसेच पोलिसांच्या क्रुर व बेकायदेशीर मारहाणीत मृत्यू पावलेल्या सोमनाथ सूर्यवंशी यांच्या हत्येच्या दोषाखाली पोलिसांची एसआयटी मार्फत चौकशी करून दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करून त्यांना अटक करण्यात यावी अशी मागणी मातंग युथ फेडरेशन महाराष्ट्र राज्य शाखा सिंदखेडराजा यांच्या वतीने सिंदखेडराजा तहसीलदार यांना निवेदन देऊन करण्यात आली. या प्रकरणातील दोषींवर योग्य कारवाई झाली नाही तर मातंग युथ फेडरेशनच्या वतीने राजव्यापी आंदोलन करण्यात येईल, असा इशारा ही या वेळी फेडरेशनच्या वतीने संस्थापक अध्यक्ष ड. विलास साबळे यांनी दिला. निवेदन देते वेळी संस्थापक अध्यक्ष ड.विलास साबळे, माधव गवळी, सुनील लोखंडे ,पत्रकार अरुण तौर, अरुण अंभोरे, श्रीधर भालेराव, गजानन पाटोळे, गोविंद उकंडे, चंद्रमुनी साबळे, बळीराम गोपने,अतिष अवसरमोल, मनोहर भालेराव, किशोर साळवे, बाळासाहेब गायकवाड, राजु साबळे,मंगेश मोरे, लक्ष्मण निकाळजे, विशाल उकंडे,दीपक गायकवाड यांच्यासह असंख्य समाज बांधव उपस्थित होते.



## टाकळीवाडीत उभ्या ऊस पिकाला आग लावण्याचे प्रमाणात वाढ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

टाकळीवाडी/प्रतिनिधी : टाकळीवाडी तालुका शिरोळ या गावाला नदी नाही. गावाला मुरमाड शेती मोठ्या प्रमाणात.कसेबसे विहीर, बोअर यावर ऊस पीक घेतले जाते.

उन्हाळ्यामध्ये रात्रीचा दिवस करून शेतकरी ऊसाला पाणी पाजत असतो. खते,बियाणे कर्ज काढून केले जाते. बोअर, विहीर, यांच्यावर ठिबक सिंचन केले जाते. यातच उभ्या ऊस पिकाला आग लावण्याचे प्रकारामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे. यामुळे शेतकरी हैराण झाले आहेत. शेतकऱ्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे.

## जन्माला आलेलं बाळ वंश नव्हे अंश



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सैनीक टाकळी/प्रतिनिधी संजय चव्हाण

मुलगा असो अथवा मुलगी जन्माला आलेलं बाळ वंश म्हणून नव्हे तर अंश म्हणून पाहण्याची गरज आहे असे मत लेखक मनोहर भोसले यांनी व्यक्त केले. ते विशेष श्रमसंस्कार शिबिरामध्ये बोलत होते.

कुरुंदवाड येथील सहकार भूषण डॉ. एस के पाटील महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना + २ स्तर चे श्रमसंस्कार शिबिर सैनिक टाकळी येथे सुरू आहे. स्वच्छता अभियाना बरोबरच गावमध्ये वृक्षारोपण केले जात आहे. तसेच विद्यार्थ्यांच्या साठी विविध विषयावरती व्याख्याने आयोजित केली जात आहेत. या दरम्यान सैनिक टाकळी येथील इयत्ता पाचवीच्या बालभारती पाठ्यपुस्तकांमधील कठीण समय येता या पाठाचे लेखक मनोहर भोसले यांनी विद्यार्थ्यांचे प्रबोधन केले. माजी सैनिक कल्याण मंडळाच्या सभागृहामध्ये झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी सैनिक आनंदराव पाटील होते. महिलांची दशा आणि दिशा या विषयावरती बोलताना भोसले यांनी स्त्रीभ्रूणहत्येचा मुद्दा प्रकर्षाने मांडला. यावेळी एनएसएस विभागाचे कार्यक्रम अधिकारी प्रा.डी. एन. राऊत, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रा.सौ. ए .के.पाटील, सहाय्यक प्रकल्प अधिकारी प्रा.पी.एम इंगळे, सौ.करमळकर, मधुकर पोवार आदीसह विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होत्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु साक्षी पाटील हिने केले होते.



## ब्रम्हांडनायक दिनदर्शिका २०२५ चे अनावरण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/प्रतिनीधी : ब्रम्हांडनायक दिनदर्शिका २०२५ चे अनावरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले पद्मावती मल्टीस्टेट शाखा वागदरी यांच्या वतीने आयोजित करण्यात आले होते.

यावेळी गावचे उपसरपंच पंकज सुतार, शिवराज पोमाजी, उपसरपंच दैनिक यश सिध्दी न्युज संपादक कमलाकर सोनकांबळे,प्रदीप जगताप,शरण भरमदे, श्रिशैल भरमदे,शाखाधिकारी - मोहम्मद नबी मुरूमकर, इरेश बिराजदार,गुरुनाथ कोणजी कर्मचारी आदी गावातील नागरिक उपस्थित होते.

## ८० वी वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा संपन्न

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर

# भावी जीवनाची उभारणी विद्यापीठात होते, करिता या संबंधी विद्यार्थ्यांनी सजग राहिले पाहिजे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

छत्रपती संभाजी नगर (प्रतिनिधी) : फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल व दि ऑल इंडिया नाग असोसिएशन (आईना) च्या संयुक्त विद्यमाने १५ डिसेंबर २०२४ ला संस्थेचे जनसंपर्क कार्यालय साकेतनगर येथे ८० वी वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा संपन्न झाली.

या कार्यशाळेला उद्घाटनपर मार्गदर्शन करताना सामाजिक कार्यकर्ते प्रतीक पंचशील म्हणाले की, विद्यापीठ हे एक उच्च शिक्षणाचे केंद्र असून तज्ञ निर्माण करण्याचा कारखाना आहे. वर्णव्यवस्थेवर आधारित गुरूकुल व इस्लाम ची मदरशातील शिक्षण व्यवस्था हा त्याचाच एक भाग आहे. समाजासाठी काम करावे लागते अशी भावना रुजविणारे सेलिग्मन ज्या विद्यापीठात कार्यरत होते, तिथे म्हणजे कोलंबिया विद्यापीठात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना शिक्षण घ्यायची संधी मिळाल्याने त्यांनी स्वतःला समाज कार्यासाठी वाहून घेतले, म्हणून आज आपले अस्तित्व आहे.

याप्रसंगी गोविंद कांबळे म्हणाले की, महान तत्त्वज्ञ कलेतूनच निर्माण होतात. विज्ञानाचा विद्यार्थी प्रयोगाच्या पुढे जात नाही. उद्योजक मिलिंद बागूल म्हणाले की, शिक्षण हे भ्रष्टाचाराचे कुरण होत चालले आहेत. राजकारणात दंग असलेले विद्यार्थी शिक्षणापासून दूर जात आहेत. आपले पोषाख बदलले असले तरी वैचारीक बुद्धीचे काय? टी. एन. थोरात म्हणाले की, भारताचे संविधानानुसार मनुवाद नष्ट केला असला तरी मानवी मनातून समाप्त झालेला नाही. तरी फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलची ज्योत ही टेंभा होण्याकडे वाटचाल करील.

प्रमुख वक्ते प्रा. शिवम गायकवाड म्हणाले की, विद्यापीठातील विद्यार्थ्यांची जडणघडण उच्च दर्जाची असते. १०० पुस्तकांचे ज्ञान एका वक्तृयांकडून मिळत असते म्हणून वक्तृयांचे म्हणणे समजून घेण्यासाठी भाषणाला गेले पाहिजे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जगातील तीन वेगवेगळ्या खंडातून उच्च शिक्षणातील पदव्या मिळविल्या आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ गेट समोरील बाबासाहेबांचा पुतळा आपणास विद्यापीठात चला असा बोट दाखवून संदेश देत आहे. एकाच अभ्यासक्रमात पदवी मिळविणाऱ्या महाविद्यालयीन व विद्यापीठातील विद्यार्थ्यांत निश्चित फरक असतो.

कार्यशाळेचा अध्यक्षीय समारोप करताना फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे संचालक बी. बी. मेश्राम म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या सदरील भाषणात केबन यांचे संदर्भ देऊन ज्ञान ही एक शक्ती आहे. (घपुेश्र- शवसश ळी र ुेशी.) हे स्पष्ट केले आहे. आपली भूमिका कायदे



तयार करणा-यांत असायला हवी. वर्तमानात सर्व क्षेत्रांचे खाजगीकरण होत असले तरी नौक-यांचे प्रमाण वाढत चालले असून त्यात तज्ञांची गरज असते. पूर्वीच्या काळी बी. ए., बी. एस्सी, बी. कॉम सारख्या पदव्यांची जागा आता इंजिनिअरींग व तत्सम व्यावसायिक पदव्यानी घेतलेली आहे. तरी उच्च शिक्षणाचे महत्त्व कदापिही कमी होणार नाही. मात्र त्यात गुणवत्तापूर्ण शिक्षण महत्त्वाचे असेल करिता विद्यार्थ्यांनी ते मिळविण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकराप्रमाणे १८-१८ तास अभ्यास केला पाहिजे. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्या काळात म्हटले होते की, आजचा विद्यार्थी भूतकालीन प्रज्ञावंत आणि प्रतिभावंत यांच्या तत्त्वज्ञान व वाङ्मयकृतीचा अभ्यास मन लावून करीत नाही. ही परिस्थिती आजही तशीच पहायला मिळत आहे. याचे भान ठेवून विद्यापीठातील घडामोडींवर लक्ष केंद्रित करून आपल्या उत्थानासाठी केल्या जाणाऱ्या उपाय योजनांची विद्यार्थ्यांनी चिकित्सा करीत राहिले पाहिजे. करिता गरीब, असहाय, होतकरू, गरजू विद्यार्थ्यासाठी १८-१८ तास अभ्यास करण्याची सोय उपलब्ध करून द्यायचा प्रयत्न फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलमार्फत सुरू आहे. तरी गरजवंत विद्यार्थ्यांनी संपर्क करावा जेणेकरून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अपेक्षेप्रमाणे विद्यार्थ्यांना आपले जीवनमान उंचावता येईल. जेणेकरून लहान उद्देश ठेवणे हा गुन्हा आहे. (Low im Is Crime.) या विधानाचे शिकार होण्यापासून स्वतःचा बचाव करता येईल. परिणामी विद्यार्थ्यांना माणूसकीपूर्ण जीवन साकार करता येईल.

या कार्यशाळेचे प्रास्ताविक एड. विलास रामटेके व सुत्रसंचालन महादेव डांबरे यांनी केले. या कार्यशाळेला बी. बी. मेश्राम, थोरात टी. एन., प्रा. शिवम गायकवाड, प्रतीक पंचशील, उद्योजक मिलिंद बागूल, महादेव डांबरे, गोविंद कांबळे, विराज गोविंद कांबळे, दिक्षा गोविंद कांबळे, डी. एस. पाटील, बी. बी. अंभोरे, एड. महेश लवूळकर इत्यादी प्रतिनिधी उपस्थित होते.